0068602

FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. २१, वर्ष २०२३, दिनांक ०६.०४.२३
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act ०.० , कलमे Sections भ्र.प्र. अधि. १९८८ सुधारित २०१८
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections कायदा २०१८
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून २६.०४.२३ वेळ ........, तारीख पर्यंत ०६.०४.२३ वेळ १३:४५
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ०८.०५.२३, वेळ १८:००
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........, तारीख ०६.०४.२३ वेळ ०६:१५
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव जिमखाना भवन समोर, चर्चगेट स्थानकाजवळ, महर्षी कर्वे रोड, दक्षिण वाहिनी, चर्चगेट, मुंबई, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव : ........, तालुका ........, ज़िल्हा ........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव पवन मनोज घोते (b) वडिलांचे / पतीचे नाव मनोज घोते
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय २६ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ८८२०८२०६८९
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste सोनार, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता ........, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
C/3 रूम नं ३२३, सद्भावना बिल्डिंग, फणसवाडी, ठाकुरद्वार, चर्नीरोड, मुंबई ०२
Address Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........, राज्य महाराष्ट्र, सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फ़ॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
सुनिल हरी भारंबे, ५० वर्षे, पद- दुय्यम अभियंता (अति. कार्य. (प्रभारी) सहायक अभियंता), कार्यालय- क वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई रा.ठि. कॉसमॉस प्राइड, फ्लॅट नं. ३०१, गावदेवी मैदानाजवळ, नवपाडा, ठाणे (प.) मो.क्र. ९८१९५०३४१०

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

यातील फिर्यादी श्री पवन मनोज होते यांचा
दि. ०६.०५-२३ रोजी स्वतंत्र कागदावर टंकलिखीत
केलेला जबाब हाच नमूद गुन्ह्याचा प्रथम खबरी
अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष,

Date 06/05/2023

(सुप्रिया नेटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
वरळी, मुंबई

P. Dhotre
07/05/2023

फिर्याद दिनांक – ०६/०५/२०२३

श्री पवन मनोज धोत्रे वय २६ वर्षे, धंदा–व्यवसाय, रा.ठि ८३ सद्‌भावना बिल्डींग, तिसरा माळा, रूम नं ३१३, फणसवाडी, ठाकुरद्‌वार, मुंबई ४००००२ मो.क्र. ९९२०८२०६८९

.....

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझ्या कुटुंबियांसमवेत राहावयास आहे. मी लायजनिंगचे काम करतो तसेच माझा मित्र आलोक जैन याचे ला फ्युम या कॅफे व हूक्का बार या कॅफेचे बीएमसी व इतर शासनाशी संबंधीत परवाने संदर्भातील सर्व कामे करतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक २६/०४/२०२३ रोजी मी माझे कामानिमीत्त बाहेर असताना ए वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथुन दोन इसम हे ला फ्युम, सीता डेल, महर्षी कर्वे रोड, रूपमिलन शेजारी, चर्चगेट, मुंबई येथे आले व त्यांनी वर नमुद कॅफेला भेट देवुन पडताळणी केली व सर्व काम पाहणारे व्यक्तीला असिस्टंट इंजिनीअर श्री सुनिल भारंबे यांना येवुन भेटण्याबाबतचा निरोप ठेवला. कॅफेमधल्या लोकांनी दिलेल्या संदेशानुसार मी दिनांक ०२/०५/२०२३ रोजी लोकसेवक भारंबे यांना भेटण्याकरीता त्यांचे ए वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे गेलो असता त्यांची भेट होवु शकली नाही. त्यामुळे तेथील कर्मचारी यांचेकडून त्यांचा मोबाईल क्रमांक प्राप्त केला व त्यांना मॅसेज केला. त्यानंतर त्याच दिवशी रात्रौ ०८.३० वा. चे सुमारास त्यांनी माझे मोबाईलवर संपर्क करून मला दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि. ०३/०५/२०२३ रोजी भेटण्यास बोलावले. त्यांनतर दिनांक ०३/०५/२०२३ रोजी मला दुपारी १२.१५ वा. चे सुमारास लोकसेवक यांचे मोबाईलवरून दोनदा मला फोन आला परंतू मी गाडी चालवित असल्याने त्यांचा फोन घेवू शकलो नाही व मी त्यांना उत्तरादाखल दुपारी १२.२४ वा. चे सुमारास कॉल केला असता त्यांनी मला त्यांचे कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने माझे घरातून निघाल्यानंतर फोर्ट येथे पोहोचलो असता मी त्यांना ०१.३० वा. चे सुमारास फोन केला असता त्यांनी मला स्टारबक्स, नरीमन पॉइंट या ठिकाणी येण्यास सांगितले. त्यानुसार मी त्यांना स्टारबक्स कॅफेमध्ये भेटण्याकरीता गेलो असता सदर ठिकाणी त्यांनी मला त्यांचेकडे ला फयुम कॅफे व हुक्का पार्लरच्या पोटमाळ्यासंदर्भात तक्रार प्राप्त झाली असुन त्याबाबत कारवाई करावी लागेल, नमूद पोटमाळा अनधिकृत असल्यामुळे तो तोडावा लागेल असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना नमूद कारवाई थांबविण्याकरीता काय उपाय करावे किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता त्यांनी नमूद कारवाई थांबविण्याकरीता दुसरा उपाय म्हणजे रू. ५,००,०००/– (पाच लाख रू. फक्त) दयावे लागतील अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. नमूदवेळी मी इतकी रक्कम देवू शकत नसून दुसरा काही उपाय असल्यास सांगा अशी विनंती केली असता, तडजोडीअंती त्यांनी लाचेची रक्कम रू. ५,००,०००/– ऐवजी रू. ३,००,०००/– इतकी निश्चित केली. त्यावेळी मी सदरबाबत मालकाशी बोलून कळवितो असे सांगून सदर ठिकाणाहून निघालो.

परंतू मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने लाप्रवि येथे तक्रार देण्याची ठरविले. परंतु दरम्यान दिनांक ०४/०५/२०२३ रोजी लोकसेवक भारंबे यांनी मला सकाळी ११.१३ वा. चे सुमारास फोन करून स्टारबक्स कॅफे, हर्णीमल सर्कल, फोर्ट मुंबई येथे भेटावयास बोलावले. सदर ठिकाणी गेलो असता ते त्यांचे कार्यालयातील काही सहकारी मित्रांसह बसले होते. नमूदवेळी त्यांनी त्यांचेसोबत असलेल्या इसमाची ओळख श्री. सुबोध बांबोर्डे व श्री. सांगर नंदा गवळी अशी करून दिली. नमुद ठिकाणी लोकसेवक भारंबे यांनी पुन्हा माझेकडे पैशांची मागणी केली. परंतू त्यावेळी मी पैसे घेवून गेलो नसल्यामुळे त्यांना मी माझी पैशांची व्यवस्था झाली नसल्याचे त्याना सांगितले. त्यामुळे त्यांनी त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत दोन लाख रूपये व शनिवार पर्यंत उर्वरीत १ लाख अशी एकुण तीन लाखाची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यामुळे मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयास जावून लोकसेवक भारंबे यांचेविरोधात लेखी अर्ज सादर केला.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पंच हजर झाल्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सदर ठिकाणी हजर असलेले सपोआ सोपान गोंधे, दोन सरकारी पंच व पोलीस पथक यांची ओळख करून दिली.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी त्याच्या ताब्यातील मी दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचावयास दिला. सदर तक्रार अर्जातील मजकूर वाचून त्याबाबत पंचानी तक्रारदार यांना विचारून खात्री केली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे याच्या सुचनेवरून दोनही पंचांनी मी दिलेल्या तक्रार अर्जावर सह्या केल्या. पो.नि. सुप्रिया नटे यांनी समक्ष म्हणुन सही करून सदर तक्रार अर्ज स्वत:च्या ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया

श्री पवन मनोज धोत्रे वय २६ वर्षे यांचा दिनांक ०६/०५/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु...

मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या. सदर ठिकाणी पोना यादव यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर लोकसेवक यांच्या कार्यालयात जाण्यापूर्वी ते कार्यालयात असल्याबाबतची माहिती मिळणेकरिता मी लोकसेवक भारंबे यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क करावे असे ठरले व सदरचा कॉल हा ध्वनीमुद्रीत करण्यात येईल, याबाबत पोनि सुप्रिया नटे यांनी मला व पंचांना सुचना दिल्या.

त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझा मोबाईल क्रमांक ९९२०८२०६८९ वरून लोकसेवक भारंबे यांचा मोबाईल क्रमांक ९८१९५०३४१० वर कॉल केला व मी त्यांना भेटावयाचे असल्याबाबत सांगितले असता त्यांनी मला स्टाबक्स येथे भेटावयास बोलावले. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. सदर कॉलनंतर पोनि सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेनुसार पथकातील अंमलदारांनी पडताळणीकरीता आवश्यक साधनसामुग्री सोबत घेवून एका शासकीय वाहनाने पंच व पडताळणी पथकासह आम्ही सदर ठिकाणाहून रवाना झालो. उर्वरीत पथक व एक शासकीय वाहन असे लाप्रवि कार्यालयाच्या आवारात थांबून राहिले.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांचे सुचनेवरुन, वर नमूद शासकीय वाहन हे पथकासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयातून निघून सर पोचखानवाला रोड, वरळी सी फेस, हाजी अली च्या दिशेने जात असताना लोकसेवक भारंबे यांचा कॉल माझे मोबाईलवर आला. त्याबाबत मी पोनि सुप्रिया नटे यांना सांगितले. तोपर्यंत सदर कॉल कट झाला. त्यामुळे पोनि सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी नमूद कॉलला प्रतिउत्तर म्हणून लोकसेवक भारंबे यांचे मोबाईलवर पुन्हा फोन केला. नमुदचा कॉल रेकॉर्डवर ठेवण्याकरीता पोनि सुप्रिया नटे यानी यापुर्वी दिलेल्या सुचनेनुसार माझे मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी पोनि नटे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू केला. नमुद कॉल झालेनंतर पोनि नटे यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद केला सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. नमूद कॉलदरम्यान लोकसेवक यांनी मला त्यांचे कार्यालयामध्येच दुसऱ्या माळ्यावर येण्याबाबत सांगितले.

त्यानंतर पो.नि. नटे यांच्या सुचनेप्रमाणे आम्ही लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या दिशेने पेडर रोड, बाबुलनाथ, मरिन ड्राईव्ह, चर्चगेट मार्गे जात असताना माझे मोबाईलवर पुन्हा लोकसेवक भारंबे यांचा फोन आला. फोनवर झालेल्या चर्चेदरम्यान लोकसेवक यांनी मला कोठे पोहोचले याबाबत विचारणा केली असता मी त्यांना चर्चगेट जवळ पोहोचलो असून त्यांचे कार्यालयामध्ये येत असल्याबाबत लोकसेवक यांना सांगितले. सदर संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

त्यानंतर पोनि नटे यांच्या सुचनेप्रमाणे शासकीय वाहन हे एम.जी. रोड, फोर्ट येथे कोणासही संशय येणार नाही असे थांबून राहिले. पो.नि.सुप्रिया नटे यांनी मला लोकसेवक भारंबे यांची भेट घेण्यास जाण्याकरीता सांगितले व माझेसोबत पंच श्री. चिरंगे यांना जाण्याच्या सुचना देवून घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यांनतर पोना यादव यांच्या मदतीने पो.नि. नटे यांनी माझे छातीजवळ शर्टाचे आतील बाजूस बनियानला व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावला. त्यानंतर मी व श्री. चिरंगे असे लोकसेवक भारंबे यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात गेलो असता लोकसेवक यांनी पंच श्री. चिरंगे यांना खाली जाण्यास सांगितले व त्यांचेसोबत त्यांचेच कार्यालयातील एक माणूस दिला. त्यानुसार पंच श्री. चिरंगे हे नमूद माणसाबरोबर इमारतीच्या तळमजल्यावर जावून थांबले. लोकसेवक यांचे कार्यालयात त्यांचे सहकारी श्री. बांबोर्डे हजर होते. त्यांनी माझी लोकसेवक भारंबे यांनी केलेल्या इशाऱ्यावरून अंगझडती घेतली. त्यांनतर लोकसेवक भारंबे यांनी मला 'घेऊन आलात का ?...' असे विचारणा करून लाचेची रक्कम आणली किंवा कसे बाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना शनिवारी असे सांगितले असता लोकसेवक यांनी प्रथम 'सकाळी अकराच्या आत हा' असे म्हणुन नमुद रक्कम ही शनिवारी अकरा वाजणेच्या अगोदर आणणेस सांगितली. परंतु पुन्हा लगेचच लोकसेवक यांनी 'उद्या नाय आणणार का? उद्या नाय आणणार.' अशी मला विचारणा केली असता त्याबाबत मी उद्या बॅक हॉलिडे असल्याचे लोकसेवक भारंबे यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक यांनी पुन्हा अकराच्या आत म्हणुन लाचेची रक्कम शनिवारी अकराच्या आत आणुन देण्याची मला आठवण करून दिली. सदर सर्व संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदर ठिकाणाहून निघून शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी आम्ही आलो. सदर ठिकाणी आल्यानंतर पोनि नटे यांनी पोना यादव यांचे मदतीने व्हॉईस रेकॉर्डर बंद करून झालेल्या घटनेबाबत मला व



समक्ष
(सुप्रिया [illegible] नटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

P.Dhotre

पंचांना विचारणा केली असता मी वर नमूदप्रमाणे हकिगत सांगितली. त्यांनतर सदर ठिकाणाहून लाप्रवि, वरळी, मुंबई येथे परत आलेनंतर सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला. नमूद पंचनाम्यादरम्यान पोनि सुप्रिया नटे, पंच यांचेसमक्ष पोना यादव यांनी माझे व लोकसेवक भारंबे यांचे दरम्यानचे संभाषणाचे ट्रान्सक्रिप्ट माझे मदतीने तयार केले. नमूद संभाषणादरम्यान लोकसेवक भारंबे यांनी शनिवारी लाचेची रक्कम घेवून बोलाविले असल्याने पुढील कारवाईकरीता दि. ०६/०५/२०२३ रोजी लाप्रवि, वरळी कार्यालयास हजर राहण्याच्या सुचना पोनि नटे यांनी दिल्या.

त्यानुसार मी दि. ०६/०५/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी मला पुन्हा एकदा सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी मला तसेच पंच क्र १ व २, तसेच सापळा पथकातील सर्व लोकांना सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. नमूद वेळी पोनि सुप्रिया नटे यांनी सांगितले की, पंच क्र. ०१ यांच्यावर लोकसेवक भारंबे यांनी संशय व्यक्त केल्याने माझे सोबत पंच क्र. ०२ हे जातील अशा सुचना दिल्या.

दरम्यान दिनांक ०४/०५/२०२३ रोजी ठरल्याप्रमाणे आज दिनांक ०६/०५/२०२३ रोजी लोकसेवक भारंबे यांना कोठे, केव्हा व किती रकमेसह भेटावयाचे याबाबत विचारणा करणेकरीता पोनि सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार मी लोकसेवक भारंबे यांना त्यांचे ९८१९५०३४१० या सकाळी ११.४५ वा. कॉल केला त्यावेळी मी लोकसेवक भारंबे यांना **'कारवाई करू नका साहेब'** असे सांगितले असता त्यांनी **' आता मग... तुम्ही आता कसं करणार आता.'** असे म्हणून कारवाई न करण्यासाठी काय करावे अशा अर्थाची विचारणा मला केली. त्यावेळी मी असे सांगितले की, 'कारवाई करायला येवू नका झाली आहे व्यवस्था केली आहे मी दोन लाख' त्यावेळी लोकसेवक भारंबे यांनी **' तुम्ही या इकडे... तुम्ही जरा बॉम्बे... आपलं हे आहे ना... अ... आ... जर... आपलं मरिनलाईन स्टेशनचं ते ब्रिज...'** असे म्हणून सदर लाचेच्या रक्कमे सह बोलाविले. सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने ध्वनीमुद्रीत केला आहे. नमुद कॉलदरम्यान लोकसेवक यांनी लाचेची रक्कम दोन लाख रूपये घेवुन मरीनलाईन्स येथे बोलाविले असल्याने पोनि नटे यांनी लागलीच सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे आम्हा सर्वांना सांगितले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार सापळापुर्व कारवाई करण्यात आली. नमुद कारवाईदरम्यान पोनि नटे यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली असता मी त्यांना माझे बचतीतुन आणलेली रोख रक्कम रू ५०,०००/— (पन्नास हजार रूपये) माझेकडे असल्याबाबत सांगितले. त्यानंतर अंमलदारांकरवी माझी अंगझडती घेण्यात आली. त्यावेळी लाचेची रोख रक्कम रू ५०,०००/— मी पोनि नटे यांचे ताब्यात दिली. त्यानंतर पोनि नटे यांनी उर्वरीत १,५०,०००/— (एक लाख पन्नास हजार ) इतकी रक्कम माझ्या नसल्याने खेळण्यातील रू ५००/— च्या ३०० नोटा वापरण्यात येतील. त्यानंतर त्यांनी दिलेल्या सुचनेवरून मी सादर केलेल्या नोटांच्या झेरॉक्स करण्यात आल्या. सदरची रक्कम त्यांनी त्यांचे ताब्यातच ठेवली. नमुद वेळी पो.नि. नटे यांच्या सुचनेवरून पो.ह.चा. भोसले यांनी ॲन्थ्रीसीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले व त्यांचे प्रात्यक्षीक दाखविले. परंतु मी माझ्या मो/स्कूटरवर लोकसेवक यांना भेटावयास जाणार असल्याने नमुद लाचेची रक्कम ही मो/स्कूटरच्या डिक्कीमध्ये ठेवायची असल्याने नमुद वेळी सदर रक्कमेला ॲन्थ्रीसीन पावडर लावण्यात आली नाही. सदरची कारवाई माझी मो/स्कूटर ताब्यात घेतल्यानंतर सदर ठिकाणी करण्यात येईल अशी सुचना पो. नि. नटे यांनी दिली.

सदर ठिकाणची कारवाई झालेनंतर मी, पंच व सर्व पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी इमारतीच्या आवारात आलो. कारवाईकरीता निघत असताना १२.१७ वा. माझे मोबाईल फोनवर क्र. ७७०९४७१३७७ या क्रमांकावरून फोन आला व समोरून लोकसेवक बांबोर्डे हे बोलत होते. त्यांनी मला कुठे आहे याबाबत विचारणा केली असता मी त्यांना ऑपेरा हाऊस येथील कॅफेमध्ये असून पंधरा मिनिटात पोहोचत असल्याचे त्यांना सांगितले. सदर दोन्ही फोनवरील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे.

पोनि नटे यांनी आम्हा सर्वांना सांगितले की, लोकसेवक भारंबे हे लाचेची मागणी करताना फार काळजीपुर्वक बोलतात व संशयाने इतरत्र पाहतात. त्यामुळे लोकसेवक यांना पोलीस वाहनाचा व पथकाचा संशय येवू नये याकरीता पोनि नटे यांनी पोलीस पथकातील पोशि परब, मपोना तोडणकर व पोह महाडीक यांना त्यांच्या दुचाकी खाजगी वाहने घेण्यास सांगितले. त्यानुसार पोशि परब यांचे दुचाकीवर पोनि नटे, मपोना तोडणकर यांचे

श्री पवन मनोज धोत्रे वय २६ वर्षे यांचा दिनांक ०६/०५/२०२३ रोजीचा फिर्यादी जबाब पुढे चालु...

दुचाकीवर पोना आगा व पोह महाडीक हे त्यांचे वाहनावर असे शासकीय वाहनाच्या मागोमाग येण्याच्या सुचना दिल्या. तसेच त्यावेळेस मी देखील माझी दुचाकी ऑपेरा हाऊस येथे पार्क केली असून त्या ठिकाणाहून घेवून लोकसेवक यांची भेट घेणार असल्याचे पोनि नटे यांनी सांगितले. जेणेकरून लोकसेवक भारंबे यांना संशय येणार नाही. ठरल्याप्रमाणे मी पोलीस वाहनातुन मी ज्या ठिकाणी पार्क केली होती त्याठिकाणी वाहनातुन गेलो. सदर ठिकाणी ऑपेरा हाऊस, त्रिभुवनदास भिमजी झवेरी दुकानासमोर, एन एस पाटकर मार्ग, मुंबई येथे दोनही शासकीय वाहने, तसेच सोबत असलेल्या मोटर सायकलवरील पथक हे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबुन राहीले. त्यानंतर पोनि नटे यांनी दिलेल्या सुचनेनुसार पोहचा भोसले यांनी लाचेच्या रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावून सदरची रक्कम महालक्ष्मी स्विट्स असे इंग्रजीत अक्षरात निळया रंगाने लिहिलेल्या सफेद रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवली व सदरची पिशवी रस्त्यालगत उभ्या माइया अॅक्टीवा मो./स्कुटर क्र. एम.एच. ०१ सीएक्स ९९९७ च्या डिकीमध्ये ठेवली.

त्यानंतर पो.नि. नटे यांनी पुन्हा मला व पंच श्रीमती खोत यांना सापळा कारवाई बाबतच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर माइया अॅक्टीवा गाडीवर मी व पंच क्र. ०२ तसेच पोलीस पथकातील ०३ खाजगी मो/सायकल त्यावर पो.नि. नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोलीस पथक व दोन्ही शासकीय वाहने असे सर्व मरिनलाईन्सच्या दिशेने रवाना झालो. नमुद वेळी त्यानंतर सदर ठिकाणाहुन रवाना झाले असताना गिरगाव परिसारामध्ये माझे मोबाईलवर लोकसेवक बांबोर्डे यांचे ७७०९४७१३७७ या क्रमांकावरून कॉल प्राप्त झाला. त्यावेळी मी त्यांचा कॉल रिसीव्ह करून स्पिकर ऑन केला. नमुद वेळी झालेल्या संभाषणादरम्यान मी लोकसेवक बांबोर्डे यांना चर्नीरोड पर्यंत आल्याचे सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणाहुन रवाना होवुन लोकसेवक भारंबे यांनी सांगितल्याप्रमाणे मरिनलाईन्स स्टेशनजवळ पब्लिक ब्रीजच्या खाली आल्यावर लोकसेवक बांबोर्डे यांचे मोबाईलवर संपर्क केला व स्पीकर ऑन केला. त्यावेळी झालेल्या संभाषणादरम्यान त्यांना मी ब्रीजखाली असल्याचे सांगितले असता त्यांनी मला ते आमच्या शॉपमध्ये असल्याचे सांगितले. त्यामुळे मी सदर ठिकाणाहुन ला फ्युम कॅफेच्या दिशेने निघालो.

मी व पंच क्र २ श्रीमती खोत असे आम्ही आमचे ला फ्युम कॅफेजवळ आलेनंतर मी त्यांना कोणालाही संशय येवु नये याकरीता आमचे कॅफे असलेल्या इमारतीच्या जवळ बाहेरील रस्त्यावर उतरून कॅफेमध्ये आलो. त्यावेळी सदर ठिकाणी कॅफेच्या कर्मचारी यांचे व्यतिरीक्त कोणीही नव्हते. थोड्या वेळाने पंच क्र २ तसेच सापळा पथकातील अंमलदार तसेच पोनि नटे असे नमुद कॅफेमध्ये येवुन कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबुन राहीले. त्यानंतर लोकसेवक सदर ठिकाणी नसल्यामुळे मी लोकसेवक बांबोर्डे यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी ते ऑफीसला असल्याबाबत मला सांगितले. त्यानंतर मी सदरचा फोन कट केल्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी पोशि गायकवाड यांचे मदतीने डीव्हीआर मशिन बंद केली.

त्यानंतर साधारण दुपारी ०१.३५ वाजण्याचे सुमारास मी कॅफेच्या बाहेर फुटपाथजवळ लोकसेवक भारंबे व लोकसेवक बांबोर्डे यांना पाहीले असता त्यांबाबत पोनि नटे यांना सांगितले. नमूद वेळी लोकसेवक बाबर्डे यांच्या मोबाईलवरून मला मोबाईलवर फोन आला असता त्यांनी नमुद फोन स्पीकरवर टाकला त्यावेळी डीव्हीआर चालु करणे इतपत वेळ मिळाला नसल्याने सदरचा कॉल ध्वनीमुद्रीत करण्यात आला नाही परंतु नमुद कॉल दरम्यान लोकसेवक बोबर्डे यांनी लोकसेवक भारंबे हे लाफ्युम कॅफेबाहेर फुटपाथवर थाबेल असल्याचे सांगितले. नमुद कॉल समताच त्यावेळी पोनि नटे यांनी पोना गायकवाड यांचे मदतीने व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे बनियनच्या आतील बाजुस लावला. त्यावेळी लोकसेवक बांबोर्डे यांचे मोबाईलवरून लोकसेवक भारंबे यांचा कॉल प्राप्त झाल्यामुळे मी नमुद कॉल उचलतच कॅफेच्या बाहेर येवुन फुटपाथवर त्यांचे समोर हजर झालो. त्यावेळी पंच क्र २ श्रीमती खोत या देखिल कॅफेच्या मागच्या दरवाजातुन बाहेर पडुन आम्ही उभे असलेल्या फुटपाथलगत असलेल्या इमारतीच्या गेटच्या आतील बाजुस थांबुन होत्या. नमुद वेळी झालेल्या संभाषणादरम्यान लोकसेवक भारंबे यांनी 'कुठे आहे' असे म्हणुन लाचेची रक्कम कुठे आहे याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी सदरची रक्कम ही अॅक्टीवामध्ये ठेवली असल्याचे सांगुन एकुण दोन लाख रक्कम असल्याची माहिती त्यांना दिली. त्यावेळी त्यांनी मला माझी अॅक्टीवा घेवुन त्यांचे जवळच असलेल्या हयुंदाई वर्ना या गाडीच्या मागे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी कॅफेमध्ये येवुन माझे अॅक्टीवाची चावी घेतली. त्याचवेळी लोकसेवक यांनी त्यांचे गाडीमागे येण्याबाबत सांगितले असल्याचे देखिल सदर ठिकाणी हजर सापळा पथक व पंच यांना सांगुन कुणालाही संशय येवु नये म्हणुन लागलीच सदर ठिकाणाहुन अॅक्टीवा घेवुन बाहेर निघालो. त्याचवेळी माझे मागोमाग सापळा पथक देखिल



समक्ष
(सुप्रिया किरण नटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

P.Dhotre

पंच यांचे समवेत त्यांचे कडील मोटर सायकल सह निघाले. सदर ठिकाणाहुन निघालेनंतर चर्चगेट स्टेशन समोरील जीएसटी भवन जवळ, महर्षी कर्वे रोड, मुंबई येथे लोकसेवक भारंबे यांनी ते बसलेली मोटर कार रस्त्यालगत थांबवली. त्यावेळी मी माझे मोटर स्कुटरवरून उतरून लोकसेवक भारंबे यांनी बोलाविलेवरून गाडीच्या पुढच्या दरवाज्याजवळ गेलो. नमुद वेळी पंच क्र ०२ या देखिल लोकसेवक थांबलेल्या गाडीचे जवळ फुटपाथवर थांबुन होत्या. तसेच इतर सापळा पथक देखिल आस पास होते. मी दरवाज्याजवळ गेल्यानंतर लोकसेवक भारंबे यांनी 'आम्हाला फार काळजी घ्यावी लागते... ठिक आहे ठेवुन द्या आतमध्ये... या इकडुन या इकडुन ..' असे म्हणुन हाताच्या इशाऱ्याने त्यांचे समोरील मोटर कारच्या डेक्सबोर्ड मध्ये सदरची लाचेची रक्कम ठेवण्यास सांगितले. त्यानुसार मी सदरची लाचेची रक्कम डेक्सबोर्ड मध्ये ठेवली व बाजुला येवुन सापळा पथक व पंच यांना दिसेल अशाप्रकारे उजवा हात वर करून लाच स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अंमलदार यांनी नमुद मोटर कारला अटकाव करून लोकसेवक सुनिल भारंबे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक श्री सुनिल हरी भारंबे, दुय्यम अभियंता अतिरीक्त कार्यभार प्रभारी सहाय्यक अभियंता, ए वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट मुंबई यांनी मी देखभाल व लायजनिंगचे काम पाहत असलेल्या ला फ्युम कॅफे व हुक्का पार्लरमधील पोटमाळ्यावर निष्कासन कारवाई करू नये म्हणुन माझेकडे प्रथम तीन लाख इतक्या लाचेची मागणी केली. सदर बाबत दिनांक ०४/०५/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लाचेच्या रक्कमेची मागणी करून दिनांक ०६/०५/२०२३ रोजी रू दोन लाख इतक्या लाचेची रक्कम तडजोडीअंती स्विकारण्याबाबत सहमती दर्शवुन सदरची रक्कम सापळा कारवाई दरम्यान स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे, लोकसेवक श्री. सुनिल हरी भारंबे यांचेशी ओळख नसून कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचली असुन ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

Nate

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(P.D)hotre

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे नाही

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

रु. 2,00,000/- त्यामध्ये भारतीय चलनातील रु. 500/- च्या 100 नोटा मळून रु. 50,000/- व रु. 500/- च्या खेळण्यातल्या मळून 300 नोटा मळून रु. 1,50,000/-

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved रु. 2,00,000/- (दोन लाख रु. फक्त)

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र. 07 मधील आलोसे यांनी तक्रारदार हे देखभाल व स्वच्छतेचे काम पाहत असलेल्या [illegible] पार्कमधील [illegible] निष्कासनाची कारवाई करू नये म्हणून फिर्यादी यांचेकडे रु. तीन लाख लाचेची मागणी केली. सदरबाबत फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि. 08.05.23 रोजीच्या पडताळणीदरम्यान लाचेच्या रकमेची मागणी करून दि. 9.5.23 रोजी रुपये दोन लाख इतक्या लाचेची रक्कम तडजोडीअंती स्विकारण्याबाबत संमती दर्शवून सदरची रक्कम सापळा कारवाईदरम्यान स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून आलोसे यांचेविरुद्ध कलम 07 भ्र.प्र. अधि. 1988 सुधारीत कायदा 2018 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमांप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

सुप्रिया नटे, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

...................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन........................, जिल्हा........................, राज्य....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ................................................. District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

P. Dhotre 09/5/2023

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

[signature] 09/05/2023

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुप्रिया नटे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting ला.प्र.वि., मुंबई

Code No. of I. O. ...........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**